अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार

३०.०६.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १५० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### माझी कटिबद्धता संविधानाशी : विश्वास नांगरे-पाटलांचे स्पष्टीकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** - मला सगळ्यांचा प्रचंड आदर आहे. मी पो-लीस सेवेचा अधिकारी असून माझी पूर्ण कटिबद्धता संविधानाशी आणि त्याच्या मूल्यांशी आहे. नागपुरात दीक्षाभूमी असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार माझे मार्गदर्शक आहेत. विविध संघटन, संस्था यांच्या कार्यक्रमामध्ये जाणे आणि तिथे उपस्थित लोकांना भेटणे स्वाभाविक आहे, असे नांगरे पाटील यांनी म्हटले. कार्यक्रमातील भाषणाबद्दल जे आक्षेप घेतले जात आहेत, तो १९ एप्रिलचा कार्यक्रम आहे. त्यासाठी सानपाडा येथील कार्यकर्ते निमंत्रण घेऊन आले होते.

# मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा ठाकरेंवर घणाघात : 'अहंकारामुळे पक्ष रसातळाला, आता फक्त आदित्य ठाकरेंनी बाहेर पडायचं बाकी!'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्र विधान परिषद उपसभापतीपदाच्या निवडणुकीच्या ऐन तोंडावर राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा प्रचंड उलथापालथ झाली आहे.

ठाकरे गटाचे वरळीतील खंदे आमदार सचिन अहिर यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्जही दाखल केला. या धक्कादायक राजकीय भूकंपानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचा जोरदार कलगीतुरा रंगला आहे. या संपूर्ण घडामोडींवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे आणि त्यांच्या



नेतृत्वावर अत्यंत शेलक्या शब्दांत निशाणा साधला आहे. 'ठाकरे गटाच्या प्रमुखांच्या प्रचंड अहंकारामुळेच आज त्यांचा पक्ष संपण्याच्या मार्गावर आहे. एकामागून एक मोठे नेते पक्ष सोडून जात आहेत आणि आता या पन्हाळ्यातून केवळ आदित्य ठाकरे यांनीच बाहेर पडायचे बाकी राहिले आहे,' असा थेट आणि मर्मभेदी टोला बावनकुळेंनी लगावला आहे.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंच्या कार्यपद्धतीवर आणि राजकीय भूमिकेवर सडकून टीका केली आहे. ते म्हणाले की, केवळ रोज सकाळी उठून पत्रकार परिषदा घेणे, प्रसारमाध्यमांसमोर इतरांवर तोंडसुख घेणे आणि भाषणबाजीतून टोमणे मारणे याने पक्ष चालत नसतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विनाकारण चिखलफेक करण्यापेक्षा उद्धव ठाकरेंनी स्वतःच्या घरात चाललेली गळती रोखण्याकडे आणि आपला पक्ष सांभाळण्याकडे लक्ष दिले पाहिजे. जेव्हा पक्षांतर्गत नाराजी आणि गटबाजीची कुणकुण लागली होती, तेव्हाच त्यांनी जमिनीवर उतरून कार्यकर्त्यांचे दौरे करायला हवे होते. महाविकास आघाडी सरकारमध्ये मुख्यमंत्री असताना जर ठाकरेंनी मंत्रालयात बसून जनतेला आणि स्वतःच्या आमदारांना वेळ दिला असता, तर आज त्यांच्यावर ही नामुष्की ओढवली नसती. केवळ मुख्यमंत्रीपदाच्या अवाजवी लालसेपोटी आणि हट्टापायी त्यांनी स्वतःच्या हाताने कमावलेले सर्व काही गमावून बसल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# मातोश्रीवर राहून घात, खासदार फोडण्यात हात

## सचिन अहिरांबाबत अब्दुल सत्तार यांचा सर्वात खळबळजनक दावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - उबाठा गटाचे उपनेते आणि आमदार सचिन अहिर यांनी महायुतीकडून (शिवसेना) विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी अर्ज दाखल केल्याने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.



या पार्श्वभूमीवर, मत्सव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर तिखट शब्दांत हल्ला चढवला. 'उद्धव ठाकरेंनी २०१९ मध्ये सत्तेच्या हव्यासापोटी 'राजकीय धर्मांतर' केले नसते, तर आज त्यांच्यावर ही नामुष्कीची वेळ आली नसती. आज उबाठा गटात जी काही पडझड सुरू आहे, ती त्यांच्याच पापांचे फळ आहे,' असा टोला नितेश राणे यांनी लगावला. विधान भवन परिसरात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ठाकरे कुटुंबाच्या कार्यपद्धतीवर आणि राजकीय भूमिकेवर कडाडून टीका केली. राणे म्हणाले, 'पश्चिम बंगालमध्ये टीएमसी रिकामी होण्याचे मूळ कारण अभिषेक बॅनर्जी होते. अगदी तसाच एक 'अभिषेक बॅनर्जी' आमच्याकडे महाराष्ट्रात (आदित्य ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष निशाणा) आहे. त्यांच्यामुळेच उबाठा पक्ष पूर्ण रिकामा होणार आहे. आता जे काही परिणाम दिसत आहेत, ते त्याच स्वभावाचे आणि कार्यपद्धतीचे आहेत. सचिन अहिर हे कामगार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते आहेत. वरळीत आदित्य ठाकरेंच्या निवडणुकीत त्यांचे मोलाचे योगदान होते. अहिर आणि सुनील शिंदे यांच्यासारखे लोक मेहनत करतात म्हणूनच हे दोघे (उद्धव आणि आदित्य) सभागृहात बसून टोमणे मारतात. जर एवढीच हिंमत असेल, तर आदित्य ठाकरेंनी आमदारकीचा राजीनामा द्यावा आणि स्वतःच्या ताकदीवर वरळीतून पुन्हा निवडून येऊन दाखवावे. सुनील शिंदे यांनीही आता तिथे राहून वेळ वाया घालवू नये', असा सल्लाही त्यांनी दिला. २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना सख्ख्या भावापेक्षा जास्त जपले. पण, यांनी त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला.

# पंढरीच्या वारीला जाणाऱ्या ट्रॅक्टरला आयशरची जोरदार धडक

## ट्रॅक्टरचे अक्षरशः दोन तुकडे : एकाचा मृत्यू, १५ जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे वारीसाठी जाणाऱ्या भाविकांच्या ट्रॅक्टरला आयशर मालवाहू वाहनाने जोरदार धडक दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



हा भीषण अपघात भडगाव तालुक्यातील कजगाव जवळ मध्यरात्रीच्या सुमारास घडला. या दुर्घटनेत एका वारकऱ्याचा जागीच मृत्यू झाला असून, इतर १५ भाविक गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, धडकेमुळे ट्रॅक्टरचे चक्क दोन तुकडे झाले आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आषाढी वारीसाठी भाविक ट्रॅक्टरने पंढरपूरकडे मार्गस्थ झाले होते. दरम्यान, मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास कजगाव परिसराजवळ मागून येणाऱ्या एका वेगवान आयशर मालवाहू वाहनाने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ट्रॅक्टरचा चक्काचूर झाला. अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील स्थानिक ग्रामस्थ तातडीने मदतीसाठी घटनास्थळाकडे धावले.

जखमींवर उपचार सुरु ग्रामस्थांनी देवदूत बनत ट्रॅक्टरखाली अडकलेल्या जखमींना बाहेर काढले. जखमींना तात्काळ उपचारासाठी चाळीसगाव येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, वारीच्या आनंदाला अपघाताचे ग्रहण लागल्याने परिसरातून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# मुंबईतील ६ नामांकित हॉटेल्स, रेस्टॉरंटवर तुकाराम मुंढेंची कारवाई

## परवानेही रद्द करुन टाकले!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसालाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम राबवत आहे. आता अन्न व औषध प्रशासनाने मुंबईतील ६ नामांकित हॉटेल्स, रेस्टॉरंटसह बेकरींवर कारवाई करण्यात आली आहे.




मुंबईत अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्सवर एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार धडक कारवाई करण्यात आली. मुंबईतील आदित्य बिर्ला समूहाशी संबंधित एका नामांकित रेस्टॉरंटसह सहा रेस्टॉरंट, हॉटेल, बेकरी आणि क्लबच्या अन्न सुरक्षा परवान्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. भांडुप, सांताक्रूझ आणि वांद्र्यातही कारवाई नरिमन पॉइंट येथे 'फ्लिंट अँड वार्सा' या रेस्टॉरंटची २७ जून रोजी तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अन्नपदार्थांच्या चुकीच्या ब्रँडिंगचे प्रकार आढळून आले. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याने संबंधित आस्थापनेच्या परवान्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. तर बोरीवली इथल्या एम. के. बेकरीमध्ये नूतनीकरणाचे काम सुरू असतानाच अन्न उत्पादन सुरू असल्याचे आणि मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आढळल्याने कारवाई करण्यात आली. याशिवाय, भांडुप, सांताक्रूझ आणि वांद्र्यातही कारवाई करण्यात आली. दरम्यान, अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास नागरिकांनी त्वरित तक्रार नोंदवावी, असे आवाहन एफडीएने केले आहे.

यासाठी टोल-फ्री क्रमांक १८००२२२३६५ उपलब्ध करून देण्यात आला आहे. तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा धसका; बनावट एफडीए अधिकाऱ्यांची टोळी सक्रिय? एफडीए अधिकारी असल्याची बतावणी करून हॉटेलवर धाड टाकल्याची घटना समोर आली आहे.

# मराठी न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता रद्द

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकविणे बंधनकारक आहे. मराठी विषय न शिकवणाऱ्या शाळांवर एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येईल. त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्यास संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशारा शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सोमवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिला.



भाजपच्या अतुल भातखळकर यांनी राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत प्रश्न विचारला होता.

या प्रश्नाला उत्तर देताना भुसे यांनी मराठी भाषा सक्तीचा कायदा लागू करण्यात आल्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी शिकविणे अनिवार्य असल्याचे सांगितले. मराठी विषय शिकविण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक नियुक्त करणेही शाळांसाठी बंधनकारक केले आहे.



# उत्पन्न वाढवा, अन्यथा कारवाई! एसटीतील अकार्यक्षम अधिकाऱ्यांना इशारा

## परिवहन मंत्र्यांचा १ महिन्याचा अल्टिमेटम

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) उत्पन्नात अपेक्षित वाढ करण्यात अपयशी ठरणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांना एक महिन्याचा अल्टिमेटम दिला आहे.



या कालावधीत उत्पन्नवाढीसाठी ठोस परिणाम दिसून आले नाहीत, तर संबंधित अधिकाऱ्यांवर बदली, पदावनती अथवा निलंबनासारखी कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. शासनाने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्या मान्य करून मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे आता व्यवस्थापन आणि अधिकारी वर्गानेही आपल्या जबाबदारीचे भान ठेवून उत्पन्नवाढीसाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ बैठका घेऊन किंवा कागदोपत्री नियोजन करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष परिणाम दिसला पाहिजे, असा इशारा सरनाईक यांनी दिला.

यंदाच्या एप्रिल आणि मे महिन्यात, भाडेवाढ लागू असूनही एसटीला मोठा तोटा सहन करावा लागला आहे. वर्षातील सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या या दोन महिन्यांतील ही घसरण गंभीर असून ती कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही.

# राजनाथ यांच्या राजीनाम्याची काँग्रेसची मागणी

## ऑपरेशन सिंदूर शहिदांबाबत खोटी माहिती दिल्याचा आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान एकही जवान शहीद झाला नसल्याचे खोटे विधान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संसदेत केल्याचा आरोप करत, काँग्रेसने राजनाथ सिंह यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. यासोबतच, या संपूर्ण प्रकारावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणीही काँग्रेसने केली आहे.



'ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचा कोणीही जवान मारला गेलेला नाही अशा आशयाचे विधान जुलै २०२५ मध्ये राजनाथ सिंह यांनी केले होते. आता मात्र या मोहिमेतील शहिदांची नावे अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहेत. याबाबत काँग्रेसच्या माजी सैनिक विभागाचे प्रमुख कर्नल रोहित चौधरी (निवृत्त) यांनी पत्रकार परिषदेत भाजपवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, भाजप सैनिकांच्या नावावर मते मागतो, पण प्रत्यक्षात त्यांचा अपमान करतो. मे २०२५ मध्ये भारतीय सशस्त्र दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' राबवले होते. यामध्ये लष्कराचे ५ आणि हवाई दलाचा १, असे एकूण सहा जवान शहीद झाले होते. अलीकडेच या सहा जवानांची नावे 'नॅशनल वॉर मेमोरियल'च्या भिंतीवर कोरण्यात आली आहेत.

# पालिकेच्या ठेवींमध्ये ४ हजार कोटींनी घट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महापालिकेच्या मुदत ठेवींमध्ये अवघ्या दोन महिन्यांत तब्बल ४,१०९ कोटी रुपयांची घट झाली आहे.



विविध पायाभूत प्रकल्प, कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन तसेच अन्य प्रशासकीय खर्च भागवण्यासाठी मुदत ठेवींचा वापर वाढल्याने ही घट झाल्याचे समोर आले आहे. बुधवारी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत यावर वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या नोंदीनुसार, फेब्रुवारी २०२६ अखेर मुदत ठेवींची रक्कम ८१ हजार ९१९ कोटी ७१ लाख रुपये होती. मात्र एप्रिल २०२६ अखेर ती ७७ हजार ८१० कोटी ५५ लाख रुपयांवर आली आहे. म्हणजेच केवळ दोन महिन्यांत ४ हजार १०९ कोटी १६ लाख रुपयांची घट झाली आहे. महापालिकेकडे २०२१-२२ मध्ये तब्बल ९१ हजार ६९० कोटी रुपयांच्या मुदत ठेवी होत्या. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर रस्ते, सांडपाणी प्रक्रिया, आरोग्य सुविधा, पायाभूत प्रकल्प आणि इतर विकासकामांवर खर्च वाढत गेला.

## शून्य ते पाच वर्षांतील बालकांसाठी

# राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत देशभरात शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ लस देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.



या मोहिमेच्या अनुषंगाने प्रा.आ.केंद्र शेंदुरजना घाट यांच्या वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ.चेतन कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात व परिसरात व्यापक अभियान राबविण्यात आले. या मोहिमेची सुरुवात प्रा.आ.केंद्र.शे.घाट येथून करण्यात आली.

यावेळी आरोग्य सहाय्यक संजय वाघाडे, अल्ताफ शेख, आरोग्य सेविका दिपाली तोटे, कल्पना सरणकर, आरोग्य सेवक यश राऊत, निलेश कुर्यवंशी, विवेक दौड उपस्थित होते. `याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ.चेतन कुऱ्हाडे यांनी पालकांना आवाहन केले की, पोलिओ मुक्त भारत घडविण्यासाठी तसेच आपल्या मुलाच्या निरोगी भविष्यासाठी ही मोहीम यशस्वी करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, यामुळे लहान मुलांना पोलिओचा डोस आवर्जून द्यावा.

## कौटुंबिक कलहातून पोटच्या मुलाकडून

# वृद्ध आईला लाकडी काठीने बेदम मारहाण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – दारुच्या नशेत एका मुलाने आपल्याच वृद्ध आईला लाकडी काठीने बेदम मारहाण करुन गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यात असलेल्या सातनूर येथे घडली आहे. या मारहाणीत वृद्ध आईच्या डाव्या हाताचे मनगट फॅक्चर झाले असून डोक्यालाही गंभीर दुखापत झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुनीया रामाजी कुमरे (६५) या २७ जून २०२६ रोजी दुपारी ३ ते ३.१५ वाजताच्या दरम्यान आपल्या घरी शेणाने सारवण करत होत्या. याच दरम्यान त्यांचा मुलगा शिवा रामजी कुमरे (४०) हा दारु पिऊन घरी आला. तू मला माझ्या घरी पाहिजे नाहीस, असे म्हणत त्याने वाद घालण्यास सुरुवात केली. घर सारवत असताना अचानक थोडे शेण शिवा कुमरे याच्या कपड्याला लागले. याचा राग अनावर झाल्याने आरोपी मुलगा शिवाने तेथेच पडलेली लाकडी काठी उचलली आणि आपल्या वृद्ध आईच्या डाव्या हाताच्या मनगटावर जोरात प्रहार केला. हा वार इतका भीषण होता की वृद्धेच्या हाताचे मनगट फॅक्चर झाले. एवढ्यावरच न थांबता नराधम मुलाने आईच्या डोक्यावरही काठीने मारुन त्यांना रक्तबंबाळ व गंभीर जखमी केले.

याप्रकरणी पीडित वृद्ध आईने दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या (मेडिकल सर्टिफिकेट) आधारे शेघाट पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी शिवा रामजी कुमरे याच्याविरुद्ध कलम ११८ (२), ३५१ (२), आणि ३५२ अंतर्गत गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पो-लीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# एचएसआरपी उद्यापासून सक्तीची : नंबरप्लेट नसल्यास १०००? रुपये दंड, आरटीओ सेवाही मिळणार नाहीत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ज्या वाहनधारकांनी अद्याप आपल्या वाहनांना 'हाय-सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट्स' बसवलेल्या नाहीत, त्यांना १ जुलैपासून १,००० रुपयांचा दंड भरावा लागणार आहे.




आज ३० जून रोजी अंतिम मुदत संपल्यानंतर, परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांकडून राज्यव्यापी अंमलबजावणी मोहीम राबवली जाणार आहे. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत असलेल्या सर्व वाहनांसाठी हे नियम बंधनकारक असून, दंड आकारण्यासोबतच अनेक आरटीओ सेवाही बंद करण्यात येणार आहेत.

राज्य सरकारने वारंवार मुदतवाढ देऊनही, राज्यातील सुमारे २.१ कोटी पात्र वाहनांपैकी केवळ १.०८ कोटी (४९ टक्के) वाहनांनाच आतापर्यंत एचएसआरपी बसवण्यात आले आहेत. अजूनही एक कोटींहून अधिक वाहने या नियमाच्या कक्षेत येत असल्याने, सरकारने कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.या कारवाईचा फटका आरटीओच्या दैनंदिन कामकाजालाही बसणार आहे. मात्र, फिटनेस प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी ही अट लागू असणार नाही.

# लोकशाहीच्या मंदिरातच ओंगळवाणे दर्शन!

## महिलांसमोरच २ नगरसेवकांमध्ये आईवरून शिवीगाळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिक महापालिकेच्या राजकीय वतुर्ळातून एक अत्यंत धक्कादायक आणि लोकशाहीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे.

लोकशाहीच्या पवित्र मंदिरातच लोकप्रतिनिधींनी लोकशाहीचे ओंगळवाणे दर्शन घडवलं. नवीन नाशिक प्रभाग समितीच्या अधिकृत बैठकीत भाजपचे नगरसेवक सुधाकर बडगुजर आणि अपक्ष नगरसेवक मुकेश शहाणे यांच्यातील जुना वाद पुन्हा एकदा उफाळून आला असून, या दोन्ही नगरसेवकांनी भर सभागृहात एकमेकांना अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या दोन्ही बड्या नगरसेवकांमध्ये झालेल्या या हायव्होल्टेज राड्यामुळे महापालिका प्रशासनात आणि नाशिकच्या राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, महापालिका निवडणुकीच्या काळातील जुना वाद अजूनही धुमसत असल्याचं या गंभीर आणि लाजिरवाण्या घटनेवरून पुन्हा एकदा स्पष्ट झालं आहे. दूषित पाण्याच्या प्रश्नावरून वादाची ठिणगी मिळालेल्या माहितीनुसार, नवीन नाशिक प्रभाग समितीची बैठक सुरू होती.



**वरुड :** आज पल्स पोलिओ अभियान संपुर्ण देशभरात राबविण्यात आले. या निमित्ताने नगरसेवक गोपी अढाऊ यांनी सुध्दा या देशकार्यात सहभाग घेतला होता. शहरातील एका केंद्रावर चि.हर्षवीर याला लस देते प्रसंगी उपस्थित गोपी अढाऊ व त्यांचा परिवार.

# वानखडे पॅलेस येथे शितल पेय जल व अभ्यासीकेचा शुभारंभ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील वानखडे कॉलनी स्थित वानखडे पॅलेस मध्ये नुकताच शितल पेय जल सुविधेचा आणि विद्यार्थ्याकरता अर्जुन अभ्यासीकेचा शुभारंभ करण्यात आला, कॉलनीतील नागरिकांच्या आरोग्याचे दृष्टीने शुद्ध पाणी मोफत उपलब्ध करुन देण्यात आले आहे.



परिसरातील विद्यार्थ्यांना शांत वातावरणात अगदी मोफत अभ्यास करता यावा म्हणून उत्क्रांती समूहाचे अध्यक्ष रामराव वानखडे यांनी अर्जुन अभ्यासिकेची स्थापना करण्यात आली असल्याचे मत सदर कार्यक्रमाच्या प्रास्तविकात सांगितले. या प्रसंगी निसर्ग भावसार परिषदेचे अध्यक्ष डॉ.निळकंठ यावलकर यांचे अध्यक्षतेखाली ॲड.निलेश शेंडे अमरावती यांचे हस्ते शुभारंभ करण्यात आला. उत्क्रांतीचे माजी प्राचार्य अशोक पाटील, गजानन बोहरुपी, माजी सरपंच तथा माजी सैनिक सुधाकर मानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राष्ट्रसंतांच्या खंजारी भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, विद्यार्थ्यांनी आपले लक्ष महाभारतातील अर्जुनाच्या ध्येया सारखे ठेऊन या अभ्यासिकेचा लाभ घ्यावा, असे मत अशोक पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन सी.टी.पठाण यांनी तर आभार माधुरी वानखडे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता डॉ.नितीन वानखडे, डॉ.प्रविण वानखडे, श्रीकांत गावंडे, पंकज लेकुरवाळे, ऋषीकेश बनसोडकर यांनी प्रयत्न केले.

# लेखी आदेशाशिवाय नवीन काम स्वीकारू नका!

## मोटरलोडर कामगारांना कामगार सेनेचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बृहन्मुंबई महापालिकेच्या 'एस' विभागातील २२९ मोटरलोडर कामगार मागील पाच दिवसांपासून त्यांच्या नियोजित कामाच्या प्रतीक्षेत असून, प्रशासनाकडून लेखी आदेश मिळाल्याशिवाय कोणतेही नवीन साफसफाईचे काम स्वीकारू नये, असे आवाहन 'म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने'चे उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर यांनी केले आहे.



पालिकेच्या 'एस' विभागात कचरा संकलन आणि परिवहनाचे काम कंत्राटदारामार्फत करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या निर्णयामुळे मोटरलोडर कामगारांच्या नोकऱ्या, वारसाहक्क आणि पदोन्नतीच्या संधींवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा दावा डॉ.बापेरकर यांनी केला आहे.

त्यांनी सांगितले की, २८ जुलै २०२५ रोजी काही कामगार संघटना आणि पालिका प्रशासन यांच्यात झालेल्या करारानुसार, 'घनकचरा संकलन, परिवहन आणि निष्कासन' प्रकल्पासाठी १४ मे २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेला कामगार संघटना विरोध करणार नाहीत, असे मान्य करण्यात आले होते. मात्र, या कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर मोटरलोडर कामगारांनी त्यास विरोध दर्शविला आहे. प्रशासनाकडून मोटरलोडर कामगारांना साफसफाईचे काम देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला असला, तरी हे काम कोणाच्या आदेशाने देण्यात येत आहे, याबाबत 'एस' विभागाच्या सहाय्यक आयुक्त स्पष्ट माहिती देऊ शकल्या नसल्याचा दावा डॉ.बापेरकर यांनी केला.

या बैठकीला सहाय्यक आयुक्त समरीन सय्यद, सहाय्यक अभियंता सचिन गायकवाड, सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक राठोड यांच्यासह म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर, सदस्य प्रशांत जाधव, आणि सर्व मोटरलोडर कामगार उपस्थित होते.

# संपादकीय

**यश एका दिवसात मिळत नाही, त्यासाठी सतत प्रयत्न करावे लागतात.**

## लोकशाही बळकट करण्यासाठी एसआयआर प्रक्रियेत सहभाग आवश्यक

भारतीय लोकशाहीची खरी ताकद केवळ मतदानात नसून, निवडणूक प्रक्रियेवरील जनतेच्या विश्वासात आहे. हा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी मतदार यादीची अचूकता, पारदर्शकता आणि निष्पक्षता अत्यंत महत्त्वाची असते. याच उद्देशाने भारताच्या निवडणूक आयोगाने विशेष सघन पुनरावलोकन प्रक्रिया हाती घेतली आहे. या प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांनी सक्रिय सहभाग घ्यावा, आपल्या प्रतिनिधींची नियुक्ती करावी आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयोगाने केले आहे. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देणे हे प्रत्येक राजकीय पक्षाचे लोकशाहीप्रती असलेले कर्तव्य आहे. विशेषतः निवडणूक प्रक्रियेवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या विरोधी पक्षांनी या प्रक्रियेत सहभागी होऊन आपली भूमिका कृतीतून सिद्ध करणे अधिक आवश्यक ठरते. मतदार यादी ही कोणत्याही निवडणुकीचा पाया असते. यादीत मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित मतदार, दुबार नोंदी किंवा अपात्र व्यक्तींचा समावेश राहिला, तर निवडणुकीच्या निष्पक्षतेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे वेळोवेळी मतदार यादीचे पुनरावलोकन करणे ही निवडणूक आयोगाची घटनात्मक जबाबदारी आहे. या प्रक्रियेत राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाल्यास प्रत्येक बदलावर त्यांचे लक्ष राहते आणि आवश्यक आक्षेप किंवा सूचना तत्काळ नोंदविता येतात. परिणामी संपूर्ण प्रक्रिया अधिक विश्वासार्ह आणि पारदर्शक बनते. अलिकडच्या काही वर्षांत निवडणुकांच्या निकालानंतर विरोधी पक्षांकडून ईव्हीएम, मतदार यादी किंवा निवडणूक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करण्याची परंपरा वाढली आहे. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. मात्र केवळ आरोप करण्यापेक्षा उपलब्ध अधिकृत प्रक्रियेत सहभागी होऊन त्यातील त्रुटी दाखवून देणे अधिक जबाबदार आणि प्रभावी ठरते. निवडणूक आयोगाने एसआयआर प्रक्रियेसाठी सर्व पक्षांना समान संधी दिली आहे. त्यामुळे या प्रक्रियेत सहभागी न होता नंतर निवडणूक प्रक्रियेवर अविश्वास व्यक्त करणे नैतिकदृष्ट्या कमकुवत भूमिका ठरू शकते. लोकशाहीत विरोधी पक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सरकारवर नियंत्रण ठेवणे, धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे आणि जनतेच्या हिताचे मुद्दे मांडणे ही त्यांची जबाबदारी आहे. परंतु त्याचबरोबर लोकशाही संस्थांशी रचनात्मक सहकार्य करणेही तितकेच आवश्यक आहे. निवडणूक आयोगासारख्या स्वतंत्र घटनात्मक संस्थेच्या आवाहनाला प्रतिसाद देणे म्हणजे कोणत्याही सरकारला पाठिंबा देणे नव्हे, तर लोकशाही प्रक्रियेला बळकटी देणे होय. ही बाब प्रत्येक राजकीय पक्षाने लक्षात घेतली पाहिजे. एसआयआर प्रक्रियेत सहभागी झाल्यामुळे विरोधकांना अनेक फायदे मिळू शकतात. मतदार यादीतील चुकीच्या नोंदी, पात्र मतदारांची नावे वगळली जाणे किंवा अपात्र नावे कायम राहणे यासारख्या बाबी अधिकृतरीत्या मांडता येतात. प्रत्येक हरकतीची नोंद करता येते. आवश्यक पुरावे सादर करता येतात. त्यामुळे भविष्यात निवडणुकीच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित करण्यासाठी ठोस आधारही उपलब्ध होतो. सहभाग टाळल्यास अशा संधी आपोआप गमावल्या जातात.

# प्रेमात हरवलेली माणुसकी

प्रेम... हा शब्द उच्चारला की डोळ्यांसमोर विश्वास, आपुलकी, त्याग आणि एकमेकांसाठी जगण्याची भावना उभी राहते. मात्र आजचे चित्र अनेकदा अस्वस्थ करणारे आहे. ज्या डोळ्यांत एकत्र आयुष्याची स्वप्ने असायला हवीत, त्याच डोळ्यांत कधीकधी सूड आणि द्वेषाची आग पेटताना दिसते. प्रेमाची व्याख्या इतकी कशी बदलली? लोहगडाचे नाव काही दिवसांपूर्वी इतिहास, पर्यटन आणि वारसा संवर्धनामुळे चर्चेत होते. पण आज लोहगडावर झालेल्या प्रकरणामुळे भयावह ओळख निर्माण केली आहे. यावेळी जे घडले, तो अपघात नव्हता; तो एका थंड डोक्याने आखलेला कट असल्याचा आरोप तपासात समोर आला आहे.

पुण्याजवळच्या लोहगड किल्ल्यावर घडलेली केतन अग्रवाल याच्या मृत्यूची घटना सुरुवातीला एक दुर्दैवी अपघात वाटली होती. अवघ्या काही महिन्यांवर आलेलं लग्न, आयुष्याची नवी स्वप्नं पाहणारा एक तरुण अचानक दरीत पडून मृत्यूमुखी पडल्याची बातमी स्क्रोल झाली आणि सगळ्यांनाच वाईट वाटलं. पण जसजसा तपास पुढे सरकत गेला तसतसं या प्रकरणाचं स्वरूप बदलत गेलं. पोलिस तपासात समोर आलेल्या आरोपांनुसार ही घटना अपघात नसून पूर्वनियोजित कटकारस्थान रचल्याचं समोर आलं. त्याहून धक्कादायक म्हणजे या कटात त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांचा सहभाग असल्याचा आरोप झाला. या एका घटनेने सर्वांनाच हादरवून सोडलं. कोण दोषी आणि कोण निर्दोष हे कायदा ठरवेल. मात्र या प्रकरणाने समाजासमोर काही गंभीर प्रश्न उभे केले आहेत. हे केवळ कटकारस्थानच नाही तर प्रेमाच्या नावाखाली वाढणाऱ्या मालकीहक्काच्या भावनेची, संवाद हरवत चाललेल्या कुटुंबांची, भावनिकदृष्ट्या असुरक्षित होत चाललेल्या तरुण पिढीची आणि आधुनिकतेच्या शर्यतीत मागे पडलेल्या संस्कारांची. प्रेम ही माणसाला जगायला शिकवणारी भावना आहे. पण जेव्हा प्रेमामध्ये विश्वासाऐवजी संशय,




समजूतदारपणाऐवजी हट्ट आणि स्वातंत्र्याऐवजी मालकीहक्क येतो तेव्हा त्याचं रूपांतर विनाशात होतं. तू माझीच झाली पाहिजेस, तू मला सोडून जाऊ शकत नाहीस, माझ्या मनासारखं नाही झालं तर परिणाम भोगावे लागतील अशा भावना प्रेमाच्या नसतात. त्या अहंकाराच्या असतात. केतन अग्रवाल आणि सिया गोयल यांचं लग्न नोव्हेंबरमध्ये होणार होतं. दोन्ही कुटुंबांनी मोठ्या उत्साहाने तयारी देखील केली होती. राजस्थानमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून महाल बुक करण्यात आला होता. बाहेरून सगळं स्वप्नवत दिसत होतं. पण या चमकदार चित्रामागे वास्तव वेगळंच होतं. आरोपांनुसार सियाचे चेतन चौधरीसोबत प्रेमसंबंध होते आणि तिला हे लग्न मान्य नव्हतं. इथे पहिला प्रश्न निर्माण होतो. जर एखाद्या मुलीला लग्न मान्य नसेल, तर तिने ते स्पष्टपणे सांगितलं का नाही? तिला तसं सांगण्याचं स्वातंत्र्य होतं का नाही? आणि जर होतं, तर तिने खोटेपणाचा मार्ग का निवडला? या प्रश्नांची उत्तरं शोधताना आपल्याला आपल्या समाजाकडे पाहावं लागेल.

> प्रेमाचा अर्थ 'तू माझीच' किंवा 'तू माझाच' असा कधीच नव्हता. खरे प्रेम व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आणि निर्णयाचा आदर करते. नकार स्वीकारण्याची ताकद ज्या नात्यात नसते, ते प्रेम नसून मालकीची भावना असते. आज अनेक तरुणांमध्ये नकार पचविण्याची मानसिक तयारी दिसत नाही. अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत की राग, सूड आणि हिंसेचा मार्ग निवडला जातो. ही मानसिकता अत्यंत धोकादायक आहे आणि तिचा परिणाम केवळ दोन व्यक्तींवर नव्हे, तर संपूर्ण समाजावर होतो.

आजही अनेक घरांमध्ये मुलांच्या भावना ऐकून घेण्यापेक्षा त्यांच्यासाठी निर्णय घेण्याची पद्धत आहे. मुलगा किंवा मुलगी प्रेमात आहे हे समजलं की, अनेक पालक संतापतात. संवाद करण्याऐवजी बाहेर पडण्यास बंदी घालतात. त्यामुळे मुलं सत्य सांगण्याऐवजी गोष्टी लपवायला शिकतात. सुरुवातीला छोटं वाटणारं खोटं नंतर मोठ्या संकटाचं कारण ठरतं. आई-वडील मुलांच्या शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करतात. चांगली शाळा, चांगलं कॉलेज, चांगली नोकरी यासाठी अहोरात्र कष्ट करतात. पण मुलांच्या मनात काय चाललंय हे जाणून घेण्यासाठी वेळ काढतात का? मुलं कोणासोबत फिरतात, कोणावर विश्वास ठेवतात, कोणत्या भावनिक संघर्षातून जात आहेत याबद्दल किती पालक बोलतात? हा प्रश्न प्रत्येक पालकांनी स्वतःला विचारण्याची गरज आहे. आजकाल घरात सगळे एकत्र राहतात, पण संवाद मात्र कमी झाला आहे. एका घरात राहणाऱ्या माणसांना एकमेकांच्या आयुष्यात काय चाललंय हेच माहीत नसतं. मुलं सोशल मीडियावर अनेकांशी बोलतात, पण आई-वडिलांशी दोन मनमोकळे शब्द बोलू शकत नाहीत. हीच आजची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

या प्रकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भावनिक अपरिपक्वता. आजची पिढी अत्यंत हुशार आहे. तंत्रज्ञान हाताळण्यात ती जगात कुठेही मागे नाही. पण नकार स्वीकारण्याची ताकद किती जणांमध्ये आहे? प्रेमभंग सहन करण्याची क्षमता किती जणांमध्ये आहे? एखादं नातं संपलं तर त्यातून सावरून पुढे जाण्याची मानसिकता किती जणांमध्ये आहे? आपल्या शिक्षण व्यवस्थेत गणित, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि करिअर यावर भर दिला जातो. पण भावनिक शिक्षणाचं काय? विद्यार्थ्यांना नातेसंबंध कसे सांभाळायचे, अपयश कसं स्वीकारायचं, रागावर नियंत्रण कसं ठेवायचं, मानसिक तणावाशी कसं लढायचं हे शिकवलं जातं का? दुर्दैवाने याचं उत्तर बहुतेक वेळा 'नाही' असंच आहे. आज सोशल मीडियाने प्रेमाचं एक अवास्तव चित्र उभं केलं आहे. या प्रकरणात आणखी एक बाब म्हणजे खून करूनही सत्य लपवता येईल असा झालेला भ्रम. आजच्या डिजिटल युगात परफेक्ट क्राईम नावाची गोष्ट जवळजवळ अस्तित्वात नाही. मोबाईल लोकेशन, सीसीटीव्ही, कॉल रेकॉर्ड, सोशल मीडिया संदेश, आर्थिक व्यवहार आणि इतर तांत्रिक पुरावे तपास यंत्रणांना सत्यापर्यंत पोहोचवतात. कितीही नियोजन केलं तरी गुन्हा कायमचा लपून राहत नाही. एकदा गुन्हा केला की त्याचं ओझं आयुष्यभर वाहावं लागतं. न्यायालयीन खटले वर्षानुवर्षे चालतात. तरूणाई एवढी हतबल कशी होते. सियाने चेतनच्या सोबत जे केलं, त्यामुळे एकाच वेळी तिघांची वाताहात झाली. तीन कुटुंब उद्ध्वस्त झाली. वीस वर्षाच्या एका कोवळ्या मुलीच्या मनात असे विचार आले तरी कसे असतील? समाजात मानहानी होते. आणि शेवटी शिक्षा टळली तरी आयुष्य पूर्वीसारखं राहत नाही. या घटनेत सर्वात मोठं नुकसान झालं ते केतन अग्रवालच्या कुटुंबाचं. ज्यांच्या डोळ्यांसमोर मुलाचं लग्न होणार होतं, ज्यांनी त्याच्या भविष्यासाठी स्वप्नं रंगवली होती, त्या कुटुंबाने एका क्षणात सर्व काही गमावलं. पैसा, प्रतिष्ठा आणि यश यापैकी काहीही त्यांचं दुःख भरून काढू शकत नाही.

पण याचबरोबर समाजानेही काही धडे घेण्याची गरज आहे. मुलं प्रेमात पडली म्हणून ती चुकीची ठरत नाहीत. प्रेमसंबंध असणं हा गुन्हा नाही. पण प्रेमाच्या नावाखाली खोटेपणा, फसवणूक आणि हिंसा स्वीकारणं नक्कीच चुकीचं आहे. एखादं लग्न मान्य नसेल तर स्पष्टपणे नकार देता येतो.नातं टिकत नसेल तर ते सन्मानाने संपवता येतं. पण एखाद्याचा जीव घेणं हा कोणत्याही समस्येचा उपाय असू शकत नाही. या घटनेने प्रत्येक पालक, प्रत्येक तरुण, प्रत्येक शिक्षक आणि प्रत्येक नागरिकाला एक प्रश्न विचारला आहे तो म्हणजे आपण आपल्या मुलांना यशस्वी बनवत आहोत, पण त्यांना भावनिकदृष्ट्या सक्षम बनवत आहोत का? आपण त्यांना स्पर्धा शिकवतो, पण अपयश स्वीकारायला शिकवतो का? आपण त्यांना करिअर घडवायला मदत करतो, पण आयुष्य घडवायला शिकवतो का? या प्रश्नांची उत्तरं जर आपण प्रामाणिकपणे शोधली, तर कदाचित भविष्यात एखादा केतन वाचेल, एखादं कुटुंब उद्ध्वस्त होण्यापासून वाचेल आणि समाज म्हणून आपण अधिक समंजस आणि अधिक माणूसकी जपणारे बनू.

# कर्मयोगी अग्रवाल काकाजी : ७५ वर्षांची प्रेरणादायी वाटचाल

आज आमचे आदरणीय काकाजी, संतोष गुलाबचंद अग्रवाल यांचा ७५ वा वाढदिवस. 'जीवन आपका, प्रेरणा हमारी' हे वाक्य त्यांच्या जीवनाला तंतोतंत लागू पडते. ७५ वर्षांची ही प्रेरणादायक यात्रा खरोखरच मूल्यांनी भरलेली आहे.



काकाजी म्हणजे २४ तास कामात मग्न असणारे व्यक्तिमत्व. आपला व्यवसाय सांभाळताना त्यांनी कधीच घड्याळ पाहिले नाही. त्यांच्यासाठी काम हाच धर्म आहे. 'कामात राम शोधणारे' हे त्यांचे वर्णन अगदी सार्थ आहे. व्यवसायातील सचोटी आणि कष्ट करण्याची तयारी यामुळे त्यांनी तरुणांसमोर एक आदर्श ठेवला आहे.

पण काकाजी फक्त व्यवसायापुरते मर्यादित नाहीत. सामाजिक सलोखा जपणारा त्यांचा स्वभाव सर्वांनाच आपलासा वाटतो. गोरगरीब जनतेला मनापासून मदत करणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. कोणाच्या डोळ्यात पाणी बघवत नाही त्यांना. रस्त्याने जाणारा अनोळखी माणूसही त्यांच्या मदतीमुळे 'आपला माणूस' बनून जातो. कुणाला दवाखान्याचा खर्च हवा असेल, कुणाच्या मुलीच्या लग्नाला मदत हवी असेल, काकाजी कायम पुढे असतात. उन्हाळ्यात आवर्जून ते पक्षासाठी प्याऊचीव अन्नाची सोय करतात. तसेच वाटसरूकरीता भर उन्हात थंड तेही शुद्ध पाण्याची व्यवस्था करून ठेवतात. आपल्या व्यवसायात येणारा प्रत्येकाचे समाधान व्हावे, आपल्या पायरीवरून तो समाधान घेऊन जावे हेच त्यांचे तत्व. काम होईल अथवा नाही तो नंतरचा प्रश्न आहे. पण आलेल्यांचे समाधान महत्वाचे.

धार्मिक आणि सामाजिक भान ठेवून ते समाजकार्य करतात. मंदिर, गुरुद्वारा, शाळा, रुग्णालय, कुठेही मदतीचा हात हवा असला की काकाजी सर्वात आधी उभे राहतात. धर्म म्हणजे माणुसकी हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. वयाची पंचाहत्तरी ओलांडली तरी त्यांचा उत्साह तरुणांना लाजवेल असा आहे.

त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि कपाळावरचा टिळा त्यांच्या सात्विक वृत्तीची साक्ष देतात. 'स्वस्थ रहें, दीर्घायु हों, सदा मुस्कुराते रहें' ही त्यांच्यासाठी दिलेली शुभेच्छा केवळ औपचारिकता नाही, तर आम्हा सर्वांची मनापासूनची प्रार्थना आहे.

काकाजी, तुमचे जीवन आमच्यासाठी एक चालता बोलता विद्यापीठ आहे. तुमच्या अनुभवातून, विचारांतून आणि कृतीतून आम्ही सतत शिकत राहतो. तुमचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन असेच आमच्या पाठीशी राहो.

७५ व्या वाढदिवसानिमित्त काकाजींना मानाचा मुजरा आणि दीर्घायुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!




**शेषराव नर्मदा गोपाळ कडू**
**वरुड**

# हवे हिरवे छत्र

शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाच्या शर्यतीत शहरी वृक्षसंपत्तीचे महत्त्व वारंवार दुर्लक्षित केले जात आहे. प्रत्यक्षात झाडे ही केवळ सौंदर्य नव्हे, तर पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेची अत्यावश्यक पायाभूत सुविधा आहेत.

असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो - परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच-त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून



बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो. भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# आयआयटी मद्रासकडून जिल्ह्यात 'डीडीएचआय' अंतर्गत रस्ता सुरक्षा प्रशिक्षण संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आयआयटी मद्रासच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर रोड सेफ्टी' तर्फे जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने विशेष रस्ता सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'डीडीएचआय' उपक्रमांतर्गत हे एकदिवसीय प्रशिक्षण आज नियोजन भवन येथे संपन्न झाले. या प्रशिक्षणासाठी आयआयटी मद्रासचे प्रमुख प्रकल्प अधिकारी डॉ.रोशन जोस आणि प्रकल्प अभियंता प्रदीप कुमार एनव्हीके यांनी प्रशिक्षण दिले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता आर. वाय. पाटील कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी यासह पोलीस, परिवहन, रस्ते विकास यंत्रणा, आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या सत्रामध्ये वर्गखोली प्रशिक्षणाद्वारे डीडीएचआय आणि एफपीएस ॲप्लिकेशन्स, रस्त्यावरील धोके ओळखणे, अहवाल यंत्रणा आणि विविध विभागांच्या जबाबदाऱ्या यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी ट्रॉमा केअर आणि आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसादावर विशेष चर्चा करण्यात आली. अमरावतीमधील रस्त्यांचे जाळे अधिक सुरक्षित करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला

## राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाकडून १०० कोटींचा निधी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाने भारत सरकारच्या राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळ यांच्यासोबत महाराष्ट्रातील जैन समाजातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी तसेच युवकांच्या स्वयंरोजगार व उद्योजकतेला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (चेण) केला आहे. या करारानुसार जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाकडून १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या या करारामुळे महाराष्ट्रातील जैन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज तसेच नवउद्योजकांना उद्योग-व्यवसाय उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. या सामंजस्य करारावर जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, व्यवस्थापकीय संचालक मेघना शिंदे तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाचे महाव्यवस्थापक अनिल कुमार यांनी राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाच्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आभा रानी सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे समन्वयक संदीप भंडारी, विकास आच्छा, विपिन जैन तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाचे महाव्यवस्थापक (वित्त) कुमार सुदेश, महाव्यवस्थापक (नियोजन) निक्सन माथुर, महाव्यवस्थापक (लेखा) मनोज पुनिया आणि उपमहाव्यवस्थापक पी. एस. पौणीकर उपस्थित होते.

# आंब्याच्या बागा उद्ध्वस्त होणार : 3 जुलै रोजी जलसमाधी आंदोलन करणार - राजू शेट्टी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सिंधुदुर्ग** – यंदा नैसर्गिक आपत्तीमुळे यंदा फळबागांचे, आंबा बागांचे नुकसान झाले, तसेच अपेक्षित उत्पन्नही मिळालेले नाही.

कोकणातील शेतकऱ्यांना प्रतिकलम २२० रूपये नुकसानभरपाई देऊन आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम शासनाने केले आहे. मोर्चा, आंदोलने करूनही हे मुर्दाड सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलत नाही. कोकणच्या पर्यावरणाचे संतुलन आधीच बिघडलेले असताना सरकारने देवगड येथे 'अणुऊर्जा प्रकल्प' प्रस्तावित केला आहे. हा प्रकल्प झाल्यास कोकणात शिल्लक राहिलेली आंबा, काजूची बागायती नाहीशी होऊन जाईल. कोकणचा कॅलिफोर्निया नव्हे, कोकणचे राजस्थान होईल. सरकार न्याय देणार नसेल तर जलसमाधी घेऊनच आम्ही आमचा शेवट करून घेऊ, अशी टोकाची भूमिका आता शेतकऱ्यांनी घेतली आहे.

त्यामुळे येत्या ३ जुलैला देवगड येथे होणाऱ्या जलसमाधी आंदोलनात सर्वांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले आहे.

गेल्या चार महिन्यांपासून कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकरी सरकारकडे मदतीची अपेक्षा व्यक्त करतो आहे. वातावरणातील झालेल्या बदलांमुळे आंब्याला फळधारणा झाली नाही. काजूचीही तीच अवस्था झाली आहे. अशा परिस्थितीत नैसर्गिक आपत्ती समजून राज्य व केंद्र सरकारने आपत्ती व्यवस्थापन निधीमधून भरीव निधी देणे गरजेचे होते.

# मालमत्ता गैरव्यवहार प्रकरण : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी उपसचिव सुधाकर सरोदे निर्दोष

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी उपसचिव आणि परीक्षा नियंत्रक सुधाकर सरोदे यांना विशेष लाचलुचपत प्रतिबंधक न्यायालयाने बेहिशेबी मालमत्ता आणि दस्तऐवज फेरफार प्रकरणात निर्दोष मुक्त केले.

तब्बल १४ वर्षांहून अधिक काळ चाललेल्या या खटल्यात न्यायालयाने सरोदे यांच्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले. विशेष न्यायाधीश अभिजीत नांदगावकर यांनी हा निकाल दिला.


२००२ मधील गाजलेल्या 'एमपीएससी' परीक्षा घोटाळा चौकशीदरम्यान सरोदे यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर स्थावर व जंगम मालमत्ता असल्याचे समोर आल्याचा दावा करत 'एसीबी'ने १ जून २००६ रोजी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

उत्पन्नाचा पुरावा म्हणून आयकर प्राधिकरणासमोर बनावट महसूल आणि उत्पन्न प्रमाणपत्रे सादर केल्याचा आरोपही त्यांच्यावर आयपीसी कलम ४६५, ४६८ आणि ४७१ अंतर्गत ठेवण्यात आला होता. या प्रकरणात न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि १५ साक्षीदारांच्या साक्षी तपासल्यानंतर सरोदे यांना निर्दोष मुक्त केले.

बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप सुधाकर सरोदे शासकीय सेवेत कार्यरत असताना (२२ मार्च १९७२ ते जून २००२ या कालावधीत) त्यांनी आपल्या कायदेशीर उत्पन्नाच्या स्रोतापेक्षा तब्बल ३९,४५,७४५ रुपये इतकी अधिक बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केला होता.

# महसूल घोटाळा उघड, १९७ जणांवर गुन्हे : नाशिक भूखंड घोटाळाप्रकरणी 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' हिवाळी अधिवेशनात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सर्वसमावेशक गृहनिर्माण धोरणांतर्गत गरीबांच्या घरांवर डल्ला मारणारा गेल्या १३ वर्षांतील मोठा घोटाळा महसूल विभागाने शोधून काढला असून, यात आतापर्यंत १९७ आरोपी निष्पन्न झाले असून १०४ जणांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

याबाबतचा ॲक्शन टेकन रिपोर्ट हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. विधान परिषदेत शिवसेना आमदार अनिल परब यांनी नाशिकमधील भूखंड घोटाळ्याबाबत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, एसआयटीने या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने दोन महिन्यांची मुदतवाढ मागितली आहे. १८ ऑगस्ट २०२६ पर्यंत एसआयटीचा अंतिम अहवाल येईल. त्यानंतर पुढील दोन महिन्यांत सरकार त्यावर स्क्रुटिनी करेल. नगरविकास मंत्रालय आणि महसूल विभागामार्फत डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनात या संपूर्ण घोटाळ्याचा 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' सभागृहासमोर ठेवला जाईल. नगरविकास विभागाच्या ८ नोव्हेंबर २०१३ च्या नियमानुसार, ४ एकर किंवा त्यापेक्षा जास्त मोठ्या भूखंडावर गृहप्रकल्प उभारताना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी २० टक्के घरे किंवा जागा राखून ठेवणे आणि ती म्हाडाकडे हस्तांतरित करणे बंधनकारक आहे.

हा २० टक्क्यांचा नियम टाळण्यासाठी विकासक (बिल्डर्स) आणि अधिकाऱ्यांनी मिळून मोठा घोटाळा केला.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपूर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

# मनमाडमध्ये उभारण्यात येणार भव्य 'भीमसृष्टी'

## प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मनमाडच्या ऐतिहासिक भूमीत त्यांच्या विचारांचे जतन आणि समाज परिवर्तनाच्या कार्याला प्रेरणा देणारी भव्य 'भीमसृष्टी' उभारण्यासाठी शासन सकारात्मक असून, हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाईल, अशी ग्वाही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

मनमाड येथील भीमसृष्टी उभारण्यासंदर्भात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या शासकीय निवासस्थानी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रकल्पाच्या विविध पैलूंवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, सहसचिव सोमनाथ बागुल यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले, मनमाड ही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून, त्यांच्या असंख्य आठवणी या ठिकाणी आहेत. त्या जपण्यासाठी तसेच बाबासाहेबांच्या विचारांचा आणि समाज परिवर्तनातील त्यांच्या महान कार्याचा गौरव करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, 'भीमसृष्टी' प्रकल्पाच्या उभारणीबाबत शासनाची भूमिका सकारात्मक आहे.


नाशिक जिल्ह्यातील मनमाड शहराला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याशी असलेला ऐतिहासिक आणि वैचारिक संबंध लक्षात घेऊन येथे भव्य 'भीमसृष्टी' उभारण्याची संकल्पना साकारण्यात येत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रस्तावित प्रकल्पामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, प्रेरणादायी स्मारक, भगवान गौतम बुद्ध स्मारक, अत्याधुनिक विपश्यना केंद्र, सभागृह, लँडस्केपिंग, पार्किंग तसेच नागरिकांसाठी विविध सुविधा उभारण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच बैठकीत प्रकल्पासाठी आवश्यक जागा, प्रशासकीय प्रक्रिया, निधी उपलब्धता आणि प्रभावी अंमलबजावणी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर आढावा घेण्यात आला. हा प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या कार्यवाहीला गती देण्याचे निर्देश मंत्री शिरसाट यांनी यावेळी दिले. मनमाड नगर परिषद, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प साकारल्यास मनमाड हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रेरणास्थान म्हणून विकसित होईल.

तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात राज्यातील एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास येईल, असेही मंत्री शिरसाट यांनी यावेळी सांगितले.

# विश्वास नांगरे यांनी नागपूरच्या पोलीस आयुक्तपदाचा पदभार स्वीकारताच शहरात धक्कादायक घडलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**नागपूर** – नागपूर शहराचे नवनियुक्त पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही तासांतच शहरात हत्येची धक्कादायक घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

काल दुपारी विश्वास नांगरे पाटील यांनी नागपूर शहराच्या पोलीस आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला होता. त्यानंतर हत्येची घटना घडल्याने नागपूर शहर हादरले आहे. गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फुटाळा तलाव परिसरात सायंकाळच्या सुमारास एका युवकावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला. प्राथमिक माहितीनुसार, कुख्यात गुन्हेगार शेखुचा भाचा अस्तक खान याच्यावर लाला पांडे या संशयिताने धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात अस्तक खानचा मृत्यू झाला आहे. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच गिट्टीखदान पोलिसांसह वरिष्ठ पोलिस अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिसराची नाकाबंदी करण्यात आली असून आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची विविध विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. नागपूरमधील आणखी एक धक्कादायक घटना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शहरातील हायटेक पोलीस आणि त्यांची हजारो कॅमेऱ्यांची यंत्रणा गेल्या तीन आठवड्यांपासून एका निळ्या रंगाच्या कारला शोधू शकलेली नाही. त्यामुळे एक वृद्ध त्याच्या मृत्यूनंतरही न्यायाला मुकला आहे. नागपूरच्या महाल परिसरात ७ जूनच्या पहाटे साडे पाचवाजाच्या सुमारास एका निळ्या रंगाच्या कारने अनियंत्रित होऊन मुकुंद बाभरे या ७२ वर्षीय वृद्धाला जोरदार धडक दिली होती. नित्यनेमाप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी निघालेले मुकुंद बाभरे त्या अपघातात गंभीर जखमी झाले होते. पाच दिवस रुग्णालयात मृत्यूशी झुंज दिल्यानंतर १२ जून रोजी मुकुंद बाभरे यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला.

अपघाताच्या त्या घटनेला आज तीन आठवडे उलटले, तरी आरोपीला शिक्षा देणे तर सोडून द्या, नागपूर पोलिस त्या कारचा शोध ही घेऊ शकलेले नाही. ती कार कोण चालवत होता? ती कुठून येत होती कुठे जात होती?

# मोर्शी विधानसभा मतदारसंघात ड्रग्स एमडी गांजाचा शिरकाव : युवा पिढीला वाचवण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा!

## माजी आमदार देवेंद्र भुयार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कठोर कार्यवाहीची मागणी!

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरूड –** मोर्शी विधानसभा मतदारसंघात वरुड मोर्शी तालुक्यामध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या ड्रग्स एमडी गांजाच्या विळख्यामुळे तरुण पिढीचे भविष्य धोक्यात येत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. शहरासह ग्रामीण भागातही ड्रग्स एमडी गांजा या अमली पदार्थांचा वापर आणि त्याची विक्री वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत असून पालक, शिक्षक आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी राज्य शासन व पो-लीस प्रशासनाचे लक्ष वेधत मोर्शी विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या ड्रग्सच्या अवैध साखळीवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी




केली आहे. देवेंद्र भुयार यांनी म्हटले आहे की, तरुणाई ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. मात्र वाढत्या व्यसनाधीनतेमुळे अनेक युवकांचे शिक्षण, करिअर आणि कुटुंब उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे केवळ किरकोळ आरोपींवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही, तर या अवैध व्यवसायामागील मुख्य सूत्रधार आणि पुरवठादारांपर्यंत पोहोचून त्यांचे संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त करणे आवश्यक आहे.

यावेळी मोर्शी विधानसभा मतदारसंघात विशेष एमडी गांजा ड्रग्सविरोधी मोहीम राबवावी. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी नियमित तपासणी करावी. ड्रग्स विक्रेते व पुरवठादारांवर कठोर



‘मोर्शी विधानसभा मतदारसंघातील वरूड मोर्शी तालुक्यातील तरुण पिढीला ड्रग्सच्या संकटातून वाचविण्यासाठी शासनाने विशेष मोहीम राबवावी. ड्रग्स विक्री करणाऱ्या टोळ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करून या अवैध व्यवसायाचे संपूर्ण जाळे उद्ध्वस्त करावे. युवा पिढीचे भविष्य सुरक्षित ठेवणे ही शासनाची जबाबदारी आहे.’

**–देवेंद्र भुयार, माजी आमदार मोर्शी विधानसभा**

कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करावेत. युवकांमध्ये जनजागृती अभियान राबवून व्यसनमुक्ती केंद्रांना बळ द्यावे. पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करावा. युवा पिढीचे भविष्य वाचविण्यासाठी निर्णायक लढा आवश्यक असून मोर्शी विधानसभा मतदारसंघातील वाढत्या ड्रग्सच्या संकटामुळे अनेक कुटुंबांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. वेळेवर कठोर पावले उचलली नाहीत तर भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासन, पोलीस प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी एकत्र येऊन ड्रग्समुक्त मोर्शी घडविण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे त्यामुळे ‘ड्रग्समुक्त मोर्शी – सुरक्षित भविष्य‘ यासाठी आता केवळ चर्चा नव्हे, तर कठोर आणि प्रभावी कारवाईची करण्याची मागणी माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे पल्स पोलिओ अभियान उत्साहात

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मोर्शी*** – शहरात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे राबविण्यात आली. मोर्शी शहराच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रतिक्षाताई गुल्हाने यांच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे पोलिओ बूथचे रीतसर उद्घाटन करण्यात आले.

या मोहिमेत मोर्शी शहरातील एकूण ३,५०० अपेक्षित बालकांना पोलिओचे डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. माता व बालसंगोपन विभागाच्या इनचार्ज जयश्री मोरे यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वीरित्या फत्ते झाली.

**२५ मुख्य बूथवर लसीकरण व्यवस्था**

पालकांच्या सोयीसाठी आणि एकही बालक डोसपासून वंचित राहू नये यासाठी मोर्शी शहरात एकूण २५ महत्त्वाच्या ठिकाणी पोलिओ बूथचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये प्रामुख्याने खालील केंद्रांचा समावेश होता: शाळा व शासकीय कार्यालये: नगरपरिषद शाळा, नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र.१ (आठवडी बाजार), नगरपरिषद प्राथमिक शाळा (कासारपुरा), नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. ४ (दुर्गा नगर), जिल्हा परिषद पुनर्वसन शाळा, गोपाळराव वानखडे हायस्कूल आणि नगरपरिषद कार्यालय. धार्मिक व सामाजिक ठिकाणे: समाज मंदिर (खोल वाटपुरा), हनुमान व्यायाम शाळा (रामजी बाबा), रामजी बाबा संस्थान, सावता अंगणवाडी (माळीपुरा), तारा माता मंदिर (सुलतानपूरा), हनुमान मंदिर (पेठपुरा), पेठपुरा तिवारी चाळ आणि बौद्ध विहार (पाण्याची टाकी). रुग्णालय व दवाखाने: अपना दवाखाना (फरीद कॉलनी), अभंग रुग्णालय, डॉ.युवराज जाणे यांचा दवाखाना आणि डॉ.मंजुषा पवार दवाखाना.

परिवहन व फिरते पथक: एसटी डेपो मोर्शी, बस स्टॉप (चांदूरबाजार रोड), जुना बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन, बिरसा मुंडा (गाडगे नगर) आणि प्रवासातील बालकांसाठी मोबाईल टीम क्रमांक १ कार्यरत होती. आरोग्य यंत्रणेची मोलाची उपस्थिती या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार, डॉ.प्रदीप कुराडे, डॉ.सचिन कोरडे, मेट्रन मॅडम रूथ लोखंडे, परिसेविका वर्षा दरोकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच माता व बालसंगोपन इनचार्ज जयश्री मोरे सिस्टर, आरोग्य सेविका अर्चना पवार, पुष्पा पंधरे, कल्पना पांढरे, भारती बाकडे, आणि आरोग्य कर्मचारी विनय शेलुरे, प्रशांत बेहरे, प्रकाश मंगळे, रितेश कुकडे, सुजित वानखडे, आशिष पाटील, श्रीकांत गोहाड यांच्यासह सर्व अंगणवाडी सेविका व रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हे राष्ट्रीय अभियान यशस्वी केले.

# पोलिओ लसीकरण मोठ्या उत्साहात

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***मोवाड*** – स्थानिक मोवाड शहरात सकाळ पासून मोठ्या उत्साहात प्लस पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली.



मोवाड प्रथमिक आरोग्य केंद्र येथे नगरसेवक ललित खंडेलवाल यांच्या हस्ते लसीकरणाची सुरुवात करण्यात आली. ० ते ५ वयोगटातील मुलांना लसीकरण केंद्रावर पोलिओ लस देण्यात आली. यावेळी शहरातील नागरिक व मुलानं मध्ये मोठ्या उत्साह पाहायला मिळाला. शहरातील विविध ठिकाणी नागरिकांसाठी लसीकरणाची व्यवथा करण्यात आली होती. लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी मोवाड प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.प्राजक्ता मेश्राम , डॉ.प्रतीक राऊत याच्या सह संपूर्ण कर्मचारी यांनी काटेकोर नियोजन केले होते.

# विसर्जित पीओपी मूर्तींपासून ७६० स्टडी टेबल तयार : नवी मुंबई महापालिकेचा अनोखा पर्यावरणपूरक प्रयोग

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***नवी मुंबई*** – नवी मुंबई महापालिकेने यंदा एक अनोखा आणि कौतुकास्पद प्रयोग यशस्वी केला आहे.

गणेशोत्सवात कृत्रिम तलावांमध्ये विसर्जित



झालेल्या ‘पीओपी’च्या मूर्तींवर शास्त्रोक्त प्रक्रिया करून त्यापासून शाळकरी विद्यार्थ्यांसाठी ‘स्टडी टेबल’ तयार करण्यात आले आहेत.

श्रीगणेशोत्सवात १४६ कृत्रिम तलावांमधून गोळा झालेल्या सुमारे ८ हजार पीओपी मूर्ती सुरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या पाठपुराव्यामुळे या मूर्तींच्या पुनर्प्रक्रियेचा प्रकल्प हाती घेण्यात आला. टाकाऊतून टिकाऊ निर्मिती अंतर्गत हेन्केन इंडिया आणि बिच प्लिझ इंडिया यांच्या सीएसआर निधीतून, तसेच रोटरी क्लब नवी मुंबईच्या सहकार्याने ७०० विसर्जित मूर्तींवर प्रक्रिया करण्यात आली. यातून मिळालेल्या १५०० किलो पीओपीपासून ७६० आकर्षक स्टडी टेबल तयार झाले. सदर सर्व स्टडी टेबल रबाले (आंबेडकर नगर) येथील राजश्री छत्रपती शाहू महाराज महापालिका माध्यमिक शाळा क्र. १०४ मधील गरजू विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले आहेत.

आगामी काळात मूर्तींच्या ‘पीओपी’पासून पुन्हा वापरण्यायोग्य पीओपी तयार करण्याचा महापालिकेचा विचार आहे. या संदर्भात ‘इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी’ (आयसीटी, मुंबई) या नामांकित संस्थेच्या शास्त्रज्ञांशी आणि मूर्तीकार संघटनेशी चर्चा सुरू असून, लवकरच पुढील प्रकल्प राबवला जाईल.


### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-७६/२०२६ दि.१३/०४/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्रीमती रंजना सुरेश पांडे, रा.मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वतः नामे- रंजना सुरेश पांडे, रा.मांगरुळी , ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०२/०२/१९९१** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१३/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार वरुड**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-३०३/२५-२६ दि.२५/०५/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्री लक्ष्मन फकिरजी लव्हाळे, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वतः नामे- लक्ष्मन फकिरजी लव्हाळे, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.२२/०८/१९६२** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी / /२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार वरुड**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-१७४/२०२६ दि.०४/०५/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **नुरजहाँ बेगम अब्दुल बशीर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वतः नामे- नुरजहाँ बेगम अब्दुल बशीर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.१०/०५/१९७५** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल. आज रोजी **०४/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३०/२०२६ ने.ता.३१/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) बाबाराव माणिक पाटील, वय अं.६१ वर्ष, धंदा-शेती, मु.पो.पुसला, ता.वरुड, २) साहेबराव माणिक पाटील, वय अं.५७ वर्ष, धंदा- शेती, रा.अंबाझरी रोड, नागपुर ३) जीवन माणिक पाटील, वय अं.५३ वर्ष, धंदा- मजुरी, रा.नवनित नगर, वाडी, नागपुर, ४) सुशिला उत्तमराव धराडे, वय अं.६८ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.ज्योतिबा फुले नगर, भोपाल, ता.जि.भोपाल, ५) शोभा रामकृष्ण ढोके, वय अं.५६ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.कामठी, ता.कामठी, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत माणिक बिसन पाटील व मयत शांता माणिक पाटील, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३१/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ७१७ कोटी रुपये मंजूर

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांची माहिती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राज्यात फेब्रुवारी ते जून २०२६ दरम्यान अवकाळी पाऊस, वादळी वारा आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या राज्यातील ७ लाख ९ हजार शेतकऱ्यांसाठी ७१७ कोटी रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. ही रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी विधान परिषदेत सांगितले.

आमदार विक्रम काळे, सतेज पाटील, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे व अन्य सदस्यांनी परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पाटील यांनी ही माहिती दिली. राज्यातील मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभागात झालेल्या गारपीट आणि अवकाळी पावसामुळे सुमारे १ लाख २२ हजार ९९३ हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिके आणि फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामध्ये गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या पिकांसह केळी, द्राक्षे, आंबा, काजू आणि संत्रा या फळबागा भुईसपाट झाल्या होत्या.

# पुढील वर्षापासून टीईटी ऑनलाईन : शिक्षण मंत्री भुसे यांची घोषणा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राज्यात पुढील वर्षापासून शिक्षक पात्रता परीक्षेसह (टीईटी) अन्य सर्व परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जातील.

या परीक्षा पूर्णतः पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडाव्यात म्हणून आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येईल, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सोमवारी विधानसभेत निवेदनाद्वारे केली. टीईटी परीक्षा पेपर फुटीप्रकरणी जे कुणी दोषी आढळतील त्या सर्वांवर संघटित गुन्हेगारी कायदा (मकोका) अंतर्गत गुन्हा नोंदविण्याबाबत कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करण्याबाबत तपासणी करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने २८ जूनला टीईटी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. मात्र, परीक्षेच्या आधीच पेपर फुटल्याने परिषदेवर परीक्षा पुढे ढकलण्याची नामुष्की ओढवली. या पेपर फुटीचे पडसाद आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात उमटले. विरोधी पक्षाने स्थगन प्रस्ताव मांडून पेपर फुटीवर चर्चेची मागणी केली. तर विधानपरिषदेतही विरोधकांनी गदारोळ केल्याने कामकाज तहकूब करावे लागले.

विधानसभेमध्ये अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्थगन प्रस्ताव फेटाळत याप्रकरणी निवेदन करण्याचे निर्देश सरकारला दिले. त्यानुसार भुसे यांनी आज विधानसभेत निवेदन केले. पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला वेग देण्यात आला असून या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) सोपविण्यात आला आहे. याप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा देतानाच भुसे यांनी राज्य सरकारने टीईटीची फेरपरीक्षा विनाशुल्क घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली.

त्यानुसार भिवंडीतील कोनगाव पोलिसांनी सापळा रचून प्रश्नपत्रिका विक्रीस आणणाऱ्या तिघांना अटक केली असून, या प्रकरणाचा तपास बिहार, हरियाणा आणि दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. त्यांच्या ताब्यातून २८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आली.

# ज्येष्ठ पत्रकार, संपादक चंद्रशेखर कुलकर्णी यांचं निधन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – मराठी पत्रकारितेच्या विश्वात आदराचं स्थान असणारे ज्येष्ठ पत्रकार चंद्रशेखर उर्फ चंदू कुलकर्णी यांचे मंगळवारी निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते.

चंद्रशेखर कुलकर्णी यांच्या जाण्याने मराठी पत्रकारितेतील एक बहुआयामी आणि प्रभावी लिखाण करणारे व्यक्तिमत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या निधनाने मराठी पत्रकारिता विश्वात शोकाकुल वातावरण आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या १ जुलै रोजी अंत्यसंस्कार करण्यात येतील.